**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – सोनाबाई आप्पानी सुर्यवंशी,

वय – ५० वर्षे, व्यवसाय–मजुरी,

राहणार – रा.अंबुलगा, ता.निलंगा, जि. लातूर

मी फिर्यादीला ओळखत नाही. मी आरोपींना ओळखत नाही. फिर्यादी ही आरोपी क्र.१ ची आई आहे. आरोपी क्र.२ ही फिर्यादीची कोण आहे हे मला माहीत नाही. घटनेला किती वर्षे झाले मला माहीत नाही. त्या दिवशी मी गावाला लग्नाला गेले होते. मला काही माहित नाही. फिर्यादी व आरोपींमध्ये काय झाले होते हे मला माहीत नाही. मला माहीत नाही की, आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या हातावर लोखंडी कोयता मारुन जखमी केले. मला माहीत नाही की, आरोपी क्र.२ ने फिर्यादीस दगडाने डाव्या मांडीवर व पाटीत मुक्का मार दिला व जीवे मारण्याची धमकी दिली.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली**.** वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली**.**

०२. साक्षीदारास अधोरेखांकीत भाग क वाचून दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, अधोरेखांकीत भाग क प्रमाणे घटना घडलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व मी एकाच गावचे असल्यामुळे त्यांना वाचवण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. एस. जे. पठाण यांनी नाकारला–**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2025.07.15 18:06:02 +0530

**(श्रीमती.के.पी.गाडे)**

दिनांक–१५/०७/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

निलंगा